ePaper

**विधिमंडळात एकमताने ठराव मंजूर; सीमाभाग महाराष्ट्राचाच!**



| वर्ष - 6 | अंक - 254 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार | दि. 28 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- दोन दिवसीय "संक्रांती शॉपिंग फेस्टिवल"!
- सीमावादावर अधिवेशनात कर्नाटकविरोधात एकमताने ठराव मंजूर !
- सरकार शिंदे चालवतायत की फडणवीस हा प्रश्न

# यांत्रिकी सफाईचे ‘घोडे गंगेत न्हाले’!

## बहुप्रतिक्षित निविदेला अखेर मंजुरी : आयुक्त शेखर सिंह यांचा ‘हिरवा कंदील’



**।पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नर्सिंग होम किंवा रुग्णालयांना नोंदणी देताना व दिलेल्या नोंदणीचे विहित मुदतीनंतर नुतनीकरण करताना सुधारित शुल्क आकारण्यात येणार आहे. या विषयासह चिंचवड येथील नियोजित ठिकाणी महापालिकेची नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याच्या आणि शहरातील १८ मीटर व त्यावरील रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करण्यासाठी येणा-या खर्चाच्या विषयाला प्रशासक शेखर सिंह यांनी मंजुरी दिली.

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये प्रशासक शेखर सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बैठक संपन्न झाली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विकास विषयक कामांच्या सुमारे ६७२ कोटी ८१ लाख रुपये खर्चाच्या मंजुरीचे



विषय आज प्रशासक सिंह यांच्या समोर मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. या विषयांना त्यांनी मंजुरी दिली.

महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी नियम २०२१ च्या शासन अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने महापालिका कार्यक्षेत्रातील नर्सिंग होम किंवा रुग्णालयांना नोंदणी देताना व दिलेल्या नोंदणीचे विहित मुदतीनंतर नुतनीकरण करताना सुधारित शुल्क आकारण्यात येणार आहे.

### सफाईसाठी 328 कोटी रुपयांचा खर्च...

भाग क्र.३० आणि प्रभाग क्र.२० मधील शौचालय व प्रसाधनगृहे मनुष्यबळ वापरून व यांत्रिकी पध्दतीने तसेच आवश्यक रसायने वापरून ठेकदारी पध्दतीने साफसफाई करण्याकरिता २ वर्षासाठी २ कोटी ८१ लाख रुपये खर्च होणार आहेत. शहरातील १८ मीटर व त्यावरील रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करण्यासाठी ३२८ कोटी ९५ लाख रुपये खर्च केले जाणार आहेत. सन २०२२ -२३ करिता महापालिकेच्या श्रीनगर टाकी व त्यावरील बायपास जलक्षेत्रांतील वितरण व्यवस्थेचे पाणीपुरवठा विषयक देखभाल दुरुस्ती करण्याकामी २५ लाख रुपये खर्च होणार आहे. महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्र सेक्टर २३ येथे निर्जंतुकीकरण प्रक्रियेसाठी लिक्विड क्लोरीन वायू पुरविण्यासाठी १ कोटी २४ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या विषयांसह तरतूद वर्गीकरणाच्या विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज मंजुरी दिली.
सुसज्ज रुग्णवाहिका तैनाद करण्यात आली आहे, अशी माहिती समाज विकास अधिकारी सुहास बहाद्दरपुरे यांनी दिली.

## शिंदे-फडणवीस सरकारकडून तोडगा निघण्याची शक्यता

# सोसायटीधारकांच्या समस्यांसाठी आमदार लांडगे मैदानात

## विधिमंडळ अधिवेशनात लावली लक्षवेधी चर्चा

**।पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवडसह राज्यातील सर्वच शहरातील गृहनिर्माण सोसायटींच्या समस्यांसंदर्भात नागपूर हिवाळी अधिवेशनात चर्चा होणार आहे. भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी याबाबत तोडगा काढण्यासाठ लक्षवेधी सूचना मांडली आहे. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारकडून सोसायटीकारकांना दिलासा देण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी शास्तीकर, प्राधिकरण बाधितांचा साडेबारा टक्के परतावा आणि सोसायटीधारकांच्या समस्या अशा एकूण तीन लक्षवेधी सादर केल्या होत्या. त्यापैकी शास्तीकर सरसकट माफीचा निर्णय राज् सरकारने जाहीर केला. आता साडेबारा टक्के परतावा आणि सोसायटीधारकांच्या समस्यांबाबत सरकारच्या निर्णयकडे पिंपरी-चिंचवडसह राज्यातील



सोसायटीधारकांचे लक्ष लागले आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, काही विकसकांकडून ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी चुकीची आरक्षणे आणि सुविधांची आमिषे दाखवली जातात. मात्र, प्रत्यक्षात तसे नसते. करारनामा आणि हमीपत्राप्रमाणे बांधकाम व्यावसायिक प्रत्यक्षात सुविधा देत नाहीत. पार्किंग, एसटीपी, वीज व्यवस्था, रस्ते, पाणीपुरवठा अशा अनेक बाबींमध्ये त्रूटी असतात. त्यामुळे परिणामी, बांधकाम व्यावसायिक आणि सदनिकाधारक असा वाद निर्माण होतो. हा वाद स्थानिक लोकप्रतिनिधींकडे येतो. त्यामुळे विकसिक किंवा सदनिकाधारक दोघांपैकी एकाचा रोष लोकप्रतिनिधींना सहन करावा लागतो.

> “प्रकल्पाच्या प्लॅनमध्ये मंजूर झाल्याप्रमाणे बांधकाम व्यावसायिक सदनिकाधारकांना सुविधा निर्माण करीत नाहीत. प्रशासनातील अधिकाऱ्यांना हाताशी धरुन बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेतला जातो. प्रकल्पाच्या नियोजित आराखड्यात बांधकाम व्यावसायिक सोईनुसार परस्पर बदल करीत असतात. त्याचा फटका सदनिकाधारकांना बसतो. गृहनिर्माण सोसायटी संस्थेकडे प्रकल्प हस्तांतरण करताना नियमांचे उल्लंघन केले जाते. त्यामुळे सदनिकाधारकांना फटका बसतो. याबाबत आमदार महेश लांडगे यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरू केला आहे. राज्यात पहिल्यांदाच एखादा आमदार विधानसभेत सोसयटीधारकांचे प्रश्न मांडणार आहे, ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे.
>
> - संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हा उसिंग सोसायटी फेडरेशन.

### लहू बालवडकर सोशल वेल्फेअरच्या माध्यमातून बिजनेस प्रमोटची सुवर्णसंधी


# दोन दिवसीय "संक्रांती शॉपिंग फेस्टिवल"!

## लहू बालवडकर सोशल वेल्फेअरचा पुढाकार : बाणेर-बालेवाडी परिसरात पर्वणी

**पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मकर संक्रांती हा भारतीय सण सौर कालगणनेशी संबंधीत अतिशय महत्वाचा सण असुन शेतीशी देखील संबंधीत आहे. मकर संक्रांतीपासुन हळुहळु दिवस मोठा होत जातो आणि रात्र लहान होत जाते. असं म्हणतात की या रथसप्तमीपासुन सुर्याच्या रथाला घोडे लागतात आणि सुर्यदेव चांगलेच मनावर घेतल्याप्रमाणे आग ओकायला (तापायला) सुरूवात करतात. संक्रांतीचा सण महिलांसाठी खासच असतो. लग्न झाल्यानंतर पहिल्याच संक्रात सणाला तर नव्या नवरीची चांगलीच हौसमौज केली जाते. संक्रांती सणाचे औचित्य साधत बालेवाडी येथे दोन दिवसीय "संक्रांती शॉपिंग फेस्टिवल"चे आयोजन करण्यात आले आहे.**






लहू बालवडकर सोशल वेल्फेअरच्या माध्यमातून बालवाडीत १४ आणि १५ जानेवारी दरम्यान "संक्रांती शॉपिंग फेस्टिवल"चे आयोजन करण्यात आले आहे. हा फेस्टिव्हल बालवाडी येथील, दसरा चौकातील, आठवडे बाजार ग्राउंडवर सर्वांसाठी खुला असणार आहे. बाणेर-बालेवाडीकरांना मनसोक्त खरेदी आणि लज्जतदार पदार्थांची मेजवानी एकाच छताखाली अन् तेही दोन दिवस मिळणार आहे. सकाळी ११.३० ते रात्री ९.३० पर्यंत हा फेस्टिव्हल सुरू राहील.

या ठिकणी एकाच छताखाली सर्वांना आवडणाऱ्या आणि परवडणाऱ्या वस्तू आपणास खरेदी करण्यात येणार आहेत.

यामध्ये प्रामुख्याने बनारसी साड्या, चंदेरी साड्या, कांजीवरम, पैठणी, शोभेच्या वस्तू, ज्वेलरी, पंजाबी सूट्स, प्लाझो, फाब्रिक डिझाईनर साड्या, रेडी टू वेअर ब्लाऊज, कॉटन मेन्स शर्ट्स आणि किड्स वेअर, सुगंधी हॅन्डमेड सोप, ब्युटी प्रॉडक्ट्स, खान्देशी केळीचे वेफर्स, शेंगदाणा गुळपट्टी, शोभेच्या वस्तू, सोलापुरी चादर, महिला बचत गटांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तू, लोणच्यांचे विविध प्रकार, दर्जेदार गावरान आणि घरगूती मसाले, पापड कुर्डाई, शोभेच्या वस्तू, रेडी टू कुक फूड्स, मातीची भांडी, बेडशीट असे स्टॉल असणार आहेत. या परिसरातील लोक मोठ्या संख्येने या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलला भेट देत असतात. या मध्ये स्टॉल हवा असल्यास ९८५०३०४१६६ या नंबर वर संपर्क करावा. या माध्यमातून नक्कीच आपल्या व्यवसायाला बाणेर-बालेवाडी परिसरातून चालना मिळेल.

शॉपिंग अँड फूड फेस्टिवलच्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वतःचा व्यवसाय सुरु करणाऱ्या महिला आणि व्यावसायिकांना एकत्र करत लहू बालवाडकर सोशल वेल्फेअर हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. तसेच व्यवसायावर असणाऱ्या कुटुंबांना आपल्या स्थानिक पातळीवरील उद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांना हातभार लावण्याचेही काम लहू बालवाडकर सोशल वेल्फेअर करत आहे. आपल्या स्थानिक पातळीवरील उद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांना हातभार लावण्याचा या मागचा हेतू आहे.

### उद्योजकांसाठी आणि व्यावसायिकांसाठी बिजनेस प्रोमोट करण्याची सुवर्णसंधी

**हिंजवडी आय. टी. जवळील बाणेर बालेवाडी परिसर आय. टी. रेसिडेन्स हब म्हणून झपाट्याने विकसित झाला आहे. या परिसरातील लोकांच्या रोजच्या जीवनातील गरज लक्षात घेऊन बाणेर-बालेवाडीकारणांसाठी खास संक्राती शॉपिंग फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिवलच्या माध्यमातून व्यावसायिकांसाठी बाणेर-बालेवाडी परिसरात बिझिनेझ प्रोमोट करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. आपणही आपला बिझनेस या लोकांपर्यंत या फेस्टिवलच्या माध्यमातून पोहचवू शकता. तसेच या पुढेही ऑनलाईन सेवा देऊ शकता तरी या फेस्टिवल मध्ये सहभागी होण्यासाठी ९८५०३०४१६६ या नंबर वर संपर्क करावा.**

### लहान मुलांसाठी खास आकर्षण

**या फेस्टिव्हल मध्ये लहान मुलांसाठी खास आकर्षण असणारे लांब पायाचे स्टिल्ट वॉकर, आणि जोकर यांची लहान मुलांच्या करमणुकीसाठी तसेच जम्पिंग आणि किड्स बॉऊन्सिंग टोटली फ्री असणार आहे. त्याच बरोबर थोरामोठांसाठी "ये शाम मस्तानी" हा सदाबहार गाण्यांचा प्रोग्रॅमही असणार आहे. झुंबा डान्स, बॉलीवूड डान्स" अश्या ऍक्टिव्हिटीज असणार आहेत.**

### प्राधिकरण बाधितांच्या हक्कांसाठी

# राम-लक्ष्मण जोडी सरसावली!

## राज्य सरकारकडे पाठपुरावा : भूमिपुत्रांना न्याय देण्याची मागणी



**पिंपरी-चिंचवड । । महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील भूसंपादनामुळे बांधित झालेल्या भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी भाजपाची ‘राम-लक्ष्मण ’ जोडी अर्थात शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे आणि आमदार लक्ष्मण जगताप यांनी विधानसभा अधिवेशनात दाद मागीतली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या १२.५ टक्के परताव्याच्या मुद्यावर लक्षवेधी चर्चा लावली असून, शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्णयाकडे भूमिपुत्रांचे लक्ष लागले आहे.**

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकासासाठी प्राधिकरणाने सन १९७२ पासून सन १९८३ पर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत. अशा जमीनधारकांना त्यांच्या संपादित क्षेत्राच्या १२.५ टक्के जमीन परतावा करण्यासाठी पुरेसे क्षेत्र प्राधिकरणाकडे उपलब्ध नाही.

त्यामुळे त्यांच्या संपादित क्षेत्राच्या ६.२ टक्के एवढी जमीन तिच्या मालकास प्राधिकरणाच्या अटींच्या अधिन राहून वाटप करण्यात यावी. तसेच, अशा जमिनीचा परतावा करताना २ चटई क्षेत्र एवढा निर्देशांक मंजूर करण्यात यावा. त्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक ती सुधारणा करावी, असे निर्देश तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. १ जुलै २०१९ रोजी दिले होते. मात्र, याबाबत अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे आमदार लांडगे यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करण्याचे नियोजन केले आहे. वास्तविक, राज्यात भाजपाची सत्ता असताना तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्राधिकरण बाधित भूमिपुत्रांना दिलासा देण्याचे निर्देश दिले होते. मात्र, महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या सत्ताकाळात आणि महापालिकेतील प्रशासक राजवटीमध्ये याबाबत कार्यवाही प्रशासनाकडून याबाबत अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. याबाबत आमदार लांडगे यांनी आक्रमक भूमिका घेतली असून, नागपूर येथील विधिमंडळ अधिवेशनात राज्य सरकारचे लक्ष पुन्हा वेधणार आहेत.

> सन १९७२ ते १९८३ या कालावधीत संपादित केलेल्या जमिनींकरीता एकूण १०६ लाभार्थींना २६.०३ आर इतके देय क्षेत्र आहे. प्राधिकारणाने सन १९७२ ते ८३ च्या शेतकऱ्यांसाठी २ चटई क्षेत्र निर्देशांक त्यामधील १५ टक्के वाणिज्य वारासह अनुज्ञेय करण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनाच्या मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे. पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्रांच्या जमिनी प्राधिकरणाने संपादित केल्या असून, त्याचा परतावा देण्याबाबतचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. प्राधिकरण बांधित भूमिपुत्रांना कायमस्वरुपी दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी आम्ही सभागृहात करणार आहोत.
>
> **- महेश लांडगे,**
> शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

> पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणासाठी (पीसीएनटीडीए) जमीन दिलेल्या मूळ शेतकऱ्यांना साडेबारा टक्के जमीन परतावा मिळावा यासाठी भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला. त्याला स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लेखी उत्तर दिले असून, २०१ मूळ लाभार्थी शेतकऱ्यांना जमीन परतावा देणे बाकी असल्याचे मान्य केले आहे. भूमिपुत्रांच्या न्याय हक्कांसाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार आहे.
>
> - लक्ष्मण जगताप, आमदार, भाजपा, चिंचवड विधानसभा मतदार संघ.

# राजकारण्यांना अभिनय आला पाहिजे !

## उल्हासदादा पवार : इंद्रायणी साहित्य संमेलन उत्साहात

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

एखाद्या वादामध्ये चांगल्या शब्दांची पेरणी केली तर त्या वादाचे देखील सौंदर्य वाढते. माझे गुरु बाळासाहेब भारदे नेहमी म्हणायचे वाद नको, वादाला संवादाची साथ द्या, त्यातून परिसंवाद घडवा आणि वितंडवाद वर विजय मिळवा. आत्ताचे पुढारी मात्र एकमेकांची लक्तरे काढण्यातच मोठेपण मानत आहेत. राजकारण्यांना अभिनय आला पाहिजे पण अलीकडे गहिवरण्याचे नाटक करणारे पुढारी आपण पाहत आहोत, अशी मार्मिक टिपणी माजी आमदार उल्हासदादा पवार यांनी केली.



इंद्रायणी साहित्य परिषद आणि मोशी ग्रामस्थ यांच्या वतीने आयोजित केलेल्या पहिल्या इंद्रायणी साहित्य संमेलनात माजी आमदार उल्हासदादा पवार यांची प्रकट मुलाखत नाना शिवले यांनी घेतली. यावेळी पवार यांनी राजकारण, जातीयवाद, वारकरी संप्रदाय, राजकारणी नेत्यांचे मोठेपण व सध्याची राजकीय परिस्थिती अशा विविध विषयांवर आपले परखड मत व्यक्त केले.

मोशी येथील यशवंतराव चव्हाण साहित्य नगरी, रवींद्रनाथ टागोर विचारपीठावर यावेळी संमेलनाचे अध्यक्ष कामगार नेते व माजी नगरसेवक अरुण बोऱ्हाडे, पद्मश्री गिरीश प्रभुणे,स्वागत अध्यक्ष संतोष बारणे, विश्वकर्मा पब्लिकेशनचे विशाल सोनी, संवेदना प्रकाशाचे नितीन हिरवे, कार्यकारीनी मंडळाचे अध्यक्ष संदीप तापकीर, इंद्रायणी साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. सीमा काळभोर, विकास कंद, सचिव रामभाऊ सासवडे, सहसचिव डॉ. ए. ए. मुलानी, कोषाध्यक्ष अलंकार हिंगे, सदस्य दादाभाऊ गावडे, श्रीहरी तापकीर, सुनील जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी उल्हास पवार यांच्या हस्ते संमेलनाचे अध्यक्ष अरुण बोऱ्हाडे यांनी लिहिलेल्या "अक्षर प्रतिभेतील प्रज्ञावंत" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

स्वागताध्यक्ष संतोष बारणे यांनी स्वागत केले. आभार कार्यकारणी मंडळाचे कार्यध्यक्ष सोपान खुडे यांनी मानले.

### स्व. यशवंतरा चव्हाण यांची आठवण...

यावेळी उल्हास दादा पवार यांनी सांगितले की, श्री संत ज्ञानोबा, तुकोबा, नामदेव यांना तत्कालीन परिस्थितीत त्रास देणाऱ्या प्रवृत्ती आजही आहेत. पण त्या वेगवेगळ्या वेषात आहेत. माझ्यावर भागवत संप्रदायाचा प्रभाव आहे. मामासाहेब दांडेकर यांचे कीर्तन, बाळासाहेब भारदे यांची ज्ञानेश्वरी अशा अनेक प्रज्ञावंतांचा माझ्यावर प्रभाव आहे. व्यासंगा बरोबरच सत्संगातून मी घडत गेलो. माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, शरद पवार, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख अशा अनेक मोठ्या नेत्यांचा मला जवळून सहवास लाभला. मतभेद हे लोकशाही जिवंत असण्याचे लक्षण आहे असे नेहमी यशवंतराव चव्हाण सांगायचे. मी पुणे युवक काँग्रेसचा अध्यक्ष असताना पंधरा पैशाचे पोस्ट कार्डवर यशवंतराव चव्हाण यांना विनंती पत्र पाठवले होते की, पुण्यात आल्यावर त्यांनी माझ्या घरी भेट द्यावी. यानंतर १९७३ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी यशवंतराव चव्हाण पुण्यात आले असता त्यांनी माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्याच्या विनंतीला मान देऊन नाना पेठ येथील माझ्या भाड्याच्या घरात भेट दिली होती.

## संपादकीय »

# अनधिकृत बांधकामांची मलाई !

***येत्या काही महिन्यांतच राज्यात मुंबईसह अनेक बड्या महापालिकांसह नगरपालिकांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील सर्व अनधिकृत बांधकामे नियमित करून सर्व दंड माफ करून पुनर्विकासाला परवानगी देण्याचा निर्णय जाहीर केला आहे.***

तेव्हा इतर महापालिकांच्या हद्दीतही असे निर्णय घेण्याची सर्वपक्षीयांनी मागणी केली असून त्यावर चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असेही सांगण्यात आले आहे. त्यामुळे मतांची बेगमी करण्यासाठीच याआधीच्या सरकारांप्रमाणेच देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेला निर्णय अनधिकृत बांधकामांना पाठबळ देणाराच ठरणारा आहे. त्यातूनच शहरे बकाल होण्यास हातभार लागत आहे, याकडे मात्र सत्ताधारी आणि सर्वच राजकीय पक्ष दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येते. अनधिकृत बांधकामे ही शहराची मोठी डोकेदुखी आहे. अनधिकृत बांधकामांमुळे शहरात अनेक नागरी समस्या निर्माण होतात. महापालिकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांवर नागरी सुविधा देण्याचा ताण पडतो, पण दुसरीकडे, अनधिकृत बांधकामांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा महत्वाचा महसूल बुडतो, याकडे गंभीरपणे पाहिले जात नाही.

एकतर अनधिकृत बांधकामांतूनच सध्या मोठ्या प्रमाणावर मलाई मिळते. त्यामुळे अनधिकृत बांधकामांना पाठबळ देण्याचं काम सरकारी अधिकारी आणि सत्ताधाऱ्यांसह विविध राजकीय पक्षांकडून केलं जातं. १९८० च्या दशकात अनधिकृत बांधकामांना खऱ्या अर्थाने बळ मिळालं. मुंबई, ठाणेसह नवी मुंबई, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार, मीरा-भाईंदर या मुंबईला लागूनच असलेल्या उपनगरात नागरीकरणाने वेग घेतला. मुंबईत घरे परवडत नसल्याने सर्वसामान्य माणूस मीरा-भाईंदर, वसई-विरार, कल्याण-डोंबिवली या उपनगरात वळला. घरांची मागणी वाढल्याने आपोआपच जागांचे भाव वाढून गगनाला भिडले. अधिकृत बांधकामातील घरे परवडणारी नसल्याने अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले आणि या सर्व शहरांमध्ये भूमाफिया तयार झाले. त्यांना अर्थातच प्रशासन आणि राज्यकर्त्यांचे आशीर्वाद लाभले. बिल्डर, राजकीय नेते, अधिकारी यांच्या अभद्र युतीने अनधिकृत बांधकामे करत शहराचे नियोजन तर कोलमडून टाकले, सोबतच सरकारच्या महसुलाचे मोठ्या प्रमाणावर नुकसानही केले. तरी ही अभद्र युती बांधकामांना अभय देऊन खोऱ्याने पैसा ओढत आहे. अनधिकृत बांधकामांमुळे शहराच्या विकासावर दूरगामी विपरीत परिणाम होत असतात.



## आनंदी सकाळ

# मन ताब्यात येण्यासाठी नामस्मरण हवे

जगात आजपर्यंत पुष्कळ लोकांनी दानधर्म, स्वार्थत्याग केला, पण त्यांच्यामध्ये कर्तेपणाची जाणीव राहिल्याने खऱ्या अर्थाने त्यांना निःस्वार्थी बनता आले नाही. खरे म्हणजे, आमचे मन आमच्या ताब्यात आल्याशिवाय आम्हाला निःस्वार्थी बनता येणार नाही. मन कोणत्या साधनाने आम्हाला आवरता येईल? योग, याग इत्यादी साधने त्यासाठीच सांगितली आहेत, पण ही साधने या काळात आम्हाला करता येण्यासारखी आहेत का? या साधनांसाठी लागणारी काळाची अनुकूलता आपण राहतो त्या परिस्थितीत आपल्याजवळ खास नाही. मन ताब्यात यायला सध्याच्या काळात नामस्मरणाशिवाय दुसरे साधनच नाही. कारण आज एक नामच भगवंताने अवताररूपाने आमच्यासाठी शिल्लक ठेवले आहे. तेव्हा, मन स्वाधीन होण्यासाठी सर्वांनी मनापासून नाम घ्या. नाम घेत असताना, मनाचे स्थैर्य बिघडविणारे जे विकार आहेत त्यांना आवरण्याचा प्रयत्न करा. मनाला सर्वांत मोठा विकार बाधत असेल तर तो म्हणजे अभिमान. या अभिमानासारखा आपला घात करणारा दुसरा शत्रू कोणी नसेल. तो अभिमान सोडायला आपण शिकले पाहिजे. भगवंताने आजपर्यंत एवढे अवतार घेतले ते सर्व अभिमान मारण्यासाठीच होते.

# आकाशाला गवसणी घालण्याची संधी!



## भूमिका



एव्हाना वडापाव, भजी, कंपनीचा चहा-नाश्ता समोर आला. वातावरण आल्हाददायक होते. एसीचा गारवा भर उन्हातदेखील जाणवत होता, पण मिरच्या न खाताच चारही उमेदवारांच्या डोळ्यांतून 'ढगफुटी' झाली होती. सुयोग्य व अपेक्षेपेक्षा जास्त पगार मिळण्याचा आनंद उमेदवारांच्या डोळ्यांत होता. सोबत मोकळ्या आकाशाला गवसणी घालण्याची अमर्याद संधीही तरुण पंखांना मिळाली होती. मी घेतलेल्या 'टेस्ट' योग्य आहेत की नाही याबद्दल मतमतांतरे असू शकतील. सर्वत्र सरधोपटपणे वापरता येईल असे तर मुळीच नाही हेदेखील महत्त्वाचे, मात्र स्वप्नवत वाटावा असा हा खराखुरा स्वानुभव म्हणजे जस्ट एक सॅम्पल-दी रियल स्टोरी ऑफ 'लिटमस वडापाव'!

माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम जेव्हा ट्रिपल आयटी अलाहाबादमध्ये आले तेव्हा त्यांनी मी केलेले प्रयोग आणि बदल सोबत फिरून पाहिले. ४५ मिनिटांच्या संवादानंतर अतिशय प्रेमळपणे मृदू आवाजात सर्व विद्यार्थ्यांसमोर माझी पाठ थोपटली व भाषणातदेखील माझा पूर्ण नावानिशी उल्लेख केला होता. देशभरातून आयआयटी लेव्हलचे क्रीम विद्यार्थ्यांना त्यांनी एक शिक्षक राष्ट्र निर्माण करण्यासाठी किती महत्त्वाचा असतो हे सांगितले. 'ओन्ली नॉलेज विथ इट्स ॲप्लिकेशन ॲंड विल पॉवर कॅन मेक इंडिया सुपर पॉवर! ॲन्ड द नेक्स्ट वॉर विल बी ओन्ली विथ नॉलेज ॲन्ड नॉन विथ मसल ऑर मनी!' असे माझ्या खांद्यावर हात ठेवत एपीजे म्हणाले होते.


पुढे 'प्रज्ञानम् ब्रम्ह' हेच ब्रीद घेऊन मी ट्रिपल आयटी अलाहाबादचा लोगो डिझाईन केला. मला रोख बक्षीस आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले आणि हा लोगो आजही ट्रिपल आयटी अलाहाबादची जागतिक ओळख बनत वापरला जात आहे. भारताची भावी हायटेक जनरेशन म्हणजे विद्यार्थी, मी आणि एपीजे असे एकत्र कितीतरी क्लिक झालेले फोटो आजही ट्रिपल आयटी अलाहाबादमध्ये आहेत. भूतकाळाच्या फोटोंच्या प्रकाशातून बाहेर पडत आठवणीतील 'फ्लॅशबॅक' संपत नव्या वर्तमानाची जाणीव मला झाली. डोळे उघडले तेव्हा पुढचा विचार होता तो फक्त प्रामाणिकपणे ही नवी जबाबदारी पार पाडण्याचा!१. पुढच्या क्षणी चौघांना एकत्रित आपापल्या फाईल घेऊन केबिनमध्ये मी बोलावले. फाईल न पाहता त्यांना त्या बाहेर ठेवण्यास सांगितले. प्रश्नार्थक चेहऱ्याने कोणीच काही न बोलता चौघे जण फाईल बाहेर ठेवून केबिनमध्ये पुन्हा हजर झाले.

२. त्यानंतर मी खिशातून १० रुपयांच्या ४ कोऱ्या करकरीत नोटा काढून टेबलावर ठेवल्यात. कोणीही एकमेकांशी न बोलता ३० मिनिटांत प्रत्येकाने एक वडापाव आणून थेट माझ्या केबिनमध्ये टेबलवर ठेवून पुन्हा बाहेर वेटिंग रूममध्ये वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन बसायचे आणि जाताना फोन, बॅग रिसेप्शन काऊंटरवर लॉकरमध्ये जमा करून फक्त चावी सोबत घेऊन वेगवेगळ्या दिशेला परस्परांशी न बोलता जायचे असे नियम सांगितले.

# जीवनाच्या गुणवत्तेचा प्रश्न !

**शिक्षणाची गुणवत्ता ढासळली आहे हे विधान शिक्षणाच्या गेल्या काही वर्षात सातत्याने नोंदवले गेले आहे. त्याप्रमाणे वर्तमानातही सातत्याने बोलले जाते आहे. शिक्षण गुणवत्तापूर्ण होते असे आजवर देशाच्या शैक्षणिक इतिहासात फारसे नोंदविले गेले नाही.**

शिक्षणाची गुणवत्ता ढासळली असल्याचे सांगत मराठवाड्याचे महसूल आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील पहिली ते दहावीच्या शाळांना शिकवणारे शिक्षक व स्थानिक स्वराज्य संस्थेत कार्यरत असलेल्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील सर्वांचीच परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयाला आरंभी विरोधाचा सूर आळवला गेला असला तरी शिक्षक संघटना आणि प्रशासन यांच्यातील संवाद सुरू झाल्याने सकारात्मकतेचे पाऊल पडले आहे. त्याच वेळी प्रशासनानेदेखील परीक्षा ऐच्छिक ठेवत, नापास होणाऱ्या कोणावरही कारवाई होणार नसल्याचे सूचित केले आहे. आज पडलेले हे पाऊल आज नाही तर उद्या पडणारच आहे. त्यामुळे उद्यासाठीचे हे पहिले पाऊल म्हणून त्याकडे पहायला हवे. आता अशा प्रक्रियेला सामोरे जाण्याची



मानसिकता शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्वांनीच ठेवायला हवी. या निमित्ताने गुणवत्ता का ढासळते आहे? यावरही चर्चा झाली. या निमित्ताने चर्चा सुरू झाली आहे हेही नसे थोडके.

शिक्षणाची गुणवत्ता ढासळली आहे हे विधान शिक्षणाच्या गेल्या काही वर्षात सातत्याने नोंदवले गेले आहे. त्याप्रमाणे वर्तमानातही सातत्याने बोलले जाते आहे. शिक्षण गुणवत्तापूर्ण होते असे आजवर देशाच्या शैक्षणिक इतिहासात फारसे नोंदविले गेले नाही. शिक्षणाची गुणवत्ता म्हणजे नेमके काय? हेदेखील आता निश्चित करण्याची वेळ आली आहे. मुलांना लिहिता, वाचता येणे आणि गणन करता येणे हिच केवळ गुणवत्ता असेल तर समाज स्वतःचीच फसवणूक करत आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेच्या संदर्भाने व्यापक विचार करण्याची वेळ आता आली आहे. शिक्षणातून जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज असते. जे शिक्षण जीवनाचे प्रश्न निराकरण करण्याची शक्ती देत नाही ते शिक्षण गुणवत्तेचे नाही. विनोबा म्हणतात की,आपल्या हाती असलेली पदवी हे बीकॉम आहे की बेकाम आहे हे आता ठरविण्याची गरज आहे. मुळात आपल्याकडे कोणत्याही व्यवस्थेत शिक्षण हा अग्रक्रमाचा भाग नाही. त्यामुळे स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही शिक्षण हा राजकीय जाहीरनाम्यात दिसत नाही आणि धोरणातही प्रभावीपणे प्रतिबिंबीत होताना दिसत नाही.आपला विकासाच्या योजनांवर भर असला तरी, आपल्या देशात विकासाचे परिणाम जे स्पष्टपणे दिसत नाहीत,

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सीमावादावर अधिवेशनात कर्नाटकविरोधात एकमताने ठराव मंजूर!

## विधिमंडळ अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासकीय ठराव सभागृहाच्या पटलावर मांडला

। वाशिम । महाईन्यूज ।

**महाराष्ट्र विधिमंडळ हिवाळी अधिवेशनात सीमावादाच्या मुद्द्यावर कर्नाटकविरोधात एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा शासकीय ठराव सभागृहाच्या पटलावर मांडला. हा ठराव मांडल्यानंतर विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी काही व्याकरणविषयक आणि वाक्यरचनांशी संबंधित आक्षेप घेतले. मात्र, त्यात आवश्यक बदल केले जातील, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिलं.**



### मुख्यमंत्र्यांनी मांडलेल्या शासकीय ठरावात काय?

**"नोव्हेंबर १९५६ मध्ये राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर तत्कालीन मुंबई राज्यातील बेळगाव (चंदगड तालुका वगळून) विजापूर, धारवाड व कारवार हे मराठी भाषिक जिल्हे पूर्वीच्या म्हैसूर राज्यात विलीन करण्यात आले. महाराष्ट्राने खेडे हे एक घटक, भौगोलिक सलगता, मराठी किंवा कन्नड भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्या व लोकेच्छा या सुत्रानुसार फेररचनेची मागणी केली आणि कर्नाटकातील ८६५ सीमावादीत गावांवर दावा सांगितला आहे."**

"महाराष्ट्र राज्य शासनाने दावा केलेली ८६५ गावे समाविष्ट व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाने केंद्र शासन व कर्नाटक राज्य शासन यांच्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयात २९ मार्च २००४ रोजी मूळ दावा क्र. ४/२००४ दाखल केला आहे. सर्वोच्च न्यायालयात अंतरिम अर्ज क्र. आयए ११/२०१४ वर सुनावणी अंती १२ सप्टेंबर २०१४ रोजी दाव्यातील साक्षी, पुरावे नोंदविण्यासाठी कोर्ट कमिशनर म्हणून मनमोहन सरीन, भूतपूर्व मुख्य न्यायाधीश जम्मु काश्मीर यांची नियुक्ती केली. परंतु १२ सप्टेंबर २०१४ रोजी पारित केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशात सुधारणा करावी या मागणीसह कर्नाटक शासनाने ६ डिसेंबर २०१४ रोजी अंतरिम अर्ज क्र. आयए १२/२०१४ सर्वोच्च न्यायालयात दाखल केला. सीमावादाचा प्रश्न न्यायप्रविष्ट असून ही कायदेशीर लढाई महाराष्ट्र शासन सर्व ताकदीने लढत आहे. महाराष्ट्राच्या बाजुने खटला चालविण्यासाठी या क्षेत्रातील अनुभवी असणारे ज्येष्ठ, अनुभवी व नामांकीत विधिज्ञांची पॅनलवर नियुक्ती केली आहे."

"सीमा भागातील प्रश्न, सीमा भागातील लाखो मराठी भाषिकांवर तेथील प्रशासनाकडून वर्षानुवर्ष होणारे अन्याय, मराठी भाषिकांना मिळत असलेली दुय्यम वागणूक, त्यांचेवर अत्याचार केले जाणे, त्यांच्या जीविताचा प्रश्न गंभीर होणे, इतकेच नव्हे तर समन्वयक मंत्री, सीमाप्रश्न यांनाच कर्नाटकमध्ये प्रवेश करण्यास कर्नाटक प्रशासनाकडून बंदी घालणे, मराठी भाषिकांनी आतापर्यंत शांततेने काढलेल्या अनेक पदयात्रांवर कर्नाटक पोलिसांनी अमानुषपणे लाठीमार करणे, त्यांची आंदोलने चिरडण्याचा प्रयत्न करणे व महाराष्ट्र राज्यातील वाहनांवर हल्ले करणे, तेथील मराठी भाषिकांच्या जमिनी स्थानिक विकास प्राधिकरणांकरिता संपादित करुन त्यांचे भुखंड कन्नड भाषिकांना वितरीत करणे, तसेच अल्पसंख्य आयोगाने व उच्च न्यायालयांनी दिलेल्या मराठीसह दोन्ही भाषांमध्ये स्थानिक प्राधिकरणातील दिली जाणारी शासकीय सर्व कागदपत्रे आदेशाची अंमलबजावणी न करता स्थानिक मराठी भाषिकांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे इत्यादी बाबी कर्नाटकातील स्थानिक प्रशासनाकडून जाणीवपुर्वक केला जात आहे."

"या सर्व बाबींवर केंद्र शासनाने हस्तक्षेप करण्यासाठी १४ डिसेंबर २०२२ रोजी केंद्रीय गृहमंत्री यांनी नवी दिल्ली येथे कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री यांच्या बैठकीत दोन्ही राज्यांमध्ये समन्वय ठेऊन सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत वाद न वाढविता शांतता ठेवण्याकरिता एकमत केले. असं असतानाही कर्नाटक शासनाने विपरीत भूमिका घेतलेली आहे. दरम्यान कर्नाटक विधीमंडळाने एकही इंच जमीन न देण्याच्या २२ डिसेंबर २०२२ रोजी केलेल्या ठरावामुळे सीमावादाला चिथावणी देण्याचे काम कर्नाटक सरकारकडून जाणीवपूर्वक केले जात आहे. कर्नाटक शासनाची ही भूमिका लोकशाही संकेतास धरुन नाही. एकाच देशातील दोन राज्यांमध्ये सौहार्दाचे वातावरण राहावे यासाठी महाराष्ट्राने अत्यंत खंबीरपणे व सर्व शक्तिनिशी याबाबतचा कायदेशीर लढा सनदशीर मार्गाने सुरू ठेवला आहे."

"सद्यःस्थितीत कर्नाटक राज्यात असलेल्या सीमाभागातील ८६५ मराठी भाषिक खेडे घटक, भौगोलिक सलगता, मराठी भाषिक लोकांची सापेक्ष बहुसंख्यता व महाराष्ट्रात समाविष्ठ होण्यासाठीची तेथील लोकेच्छा या तत्वांचा महाराष्ट्र राज्याने नेहमीच आदर केला आहे.

# अनिल देशमुखांना मोठा दिलासा

। नागपूर । महाईन्यूज ।

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना कोर्टाने मोठा दिलासा दिला आहे. सीबीआयची याचिका कोर्टाने फेटाळली आहे. त्यामुळे देशमुख उद्या तुरुंगाबाहेर येणार आहेत. देशमुख यांच्या सीबीआयने त्यांच्या जामिनाला स्थगिती देण्यासाठी दाखल केलेली याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. देशमुख यांची ऑर्थर रोड कारागृहातून उद्या सुटका होणार आहे.

अनिल देशमुख यांना मुंबई उच्च न्यायालयाने 12 डिसेंबर रोजी एक लाख रुपयांच्या जात मुचलक्यावर सशर्त जामीन मंजूर केला होता. पण या निर्णयाला सीबीआयने आव्हान देत उच्च न्यायालयात धाव घेतली होती.



**मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंह यांनी 2021 मध्ये राज्याचे तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले होते. देशमुख यांनी दरमहा 100 कोटी रुपयांच्या वसुलीचे आदेश दिले होते असा आरोप त्यांच्यावर परमबीर सिंह यांनी केला होता. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सीबीआयने प्राथमिक चौकसी केली होती. त्यानंतर अनिल देशमुख यांच्यासह काही जणांवर गुन्हा नोंद केला होता.**

देशमुख यांच्या जामीनाला स्थिगिती द्यावी अशी मागणी करणारी याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज उच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावत अनिल देशमुख यांचा जामीन कायम ठेवला आहे.

मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंह यांनी 2021 मध्ये राज्याचे तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केले होते. देशमुख यांनी दरमहा 100 कोटी रुपयांच्या वसुलीचे आदेश दिले होते असा आरोप त्यांच्यावर परमबीर सिंह यांनी केला होता. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सीबीआयने प्राथमिक चौखसी केली होती. त्यानंतर अनिल देशमुख यांच्यासह काही जणांवर गुन्हा नोंद केला होता.

# "सडलेली पानं झडली.."

## उद्धव ठाकरेंची खरमरीत टीका

। नागपूर । महाईन्यूज ।

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी उद्धव ठाकरे नागपूरमध्ये आहेत. सायंकाळी त्यांनी शिवसैनिकांशी संवाद सधला. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा फुटलेल्या आमदारांवर टीकास्र सोडलं. यावेळी मात्र त्यांची भाषा खरमरीत होती.

उद्धव ठाकरे बोलतांना म्हणाले की, महाविकास आघाडीमध्ये असलो तरी अद्याप कुणाला मतदारसंघ सोडलेला नाही. त्यामुळे येत्या निवडणुकांसाठी ताकदीने कामाला लागा. बाळासाहेबांनी सांगितलेला पुरुषार्थ सर्वांनी जागवावा, असं ते म्हणाले.

'आपल्याला गाव तिथे



शिवसेनेचा शाखा सुरु करायची आहे. पक्षसंघटनेवर भर द्यायचा आहे. त्यामुळे शिवसैनिकांनी एकजुटीने काम करावं' असं म्हणून त्यांनी शिंदे गटावर आसूड ओढला. सडलेली पानं झडतातच, तशी ही झडली... हा निसर्गाचा नियम असतो. त्याची खंत नको, असं ठाकरे म्हणाले.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदींसाठी बाळासाहेब एकेकाळी उभे राहिले होते. अडवाणींनी जेव्हा बाळासाहेबांना गुजरातबद्दल मत विचारलं तेव्हा बाळासाहेबांनी 'मोदी गया तो गुजरात गया' असं म्हणून मोदींना समर्थन दिलं होतं. मात्र त्यांचेच लोक आज शिवसेना संपवायला निघाले आहेत, हे दुर्दैवी आहे.

**'आपल्याला गाव तिथे शिवसेनेचा शाखा सुरु करायची आहे. पक्षसंघटनेवर भर द्यायचा आहे. त्यामुळे शिवसैनिकांनी एकजुटीने काम करावं' असं म्हणून त्यांनी शिंदे गटावर आसूड ओढला. सडलेली पानं झडतातच, तशी ही झडली... हा निसर्गाचा नियम असतो. त्याची खंत नको, असं ठाकरे म्हणाले.**

# सरकार शिंदे चालवतायत की फडणवीस?

## सध्या चोरांची सत्ता; प्रकाश आंबेडकरांची खोचक टीका

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आत्ताचं सरकार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे चालवत आहेत की उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चालवत आहेत हा मोठा प्रश्न असल्याचे म्हणत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी सरकारवर जहरी टीका केली आहे. महापुरुषांच्या अवमान केल्याच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने आज विधानभवनावर मोर्चा काढला आहे. यावेळी आंडेबकरांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना सध्याचं सरकार हे चोरांचं सरकार आहे. हे सरकार बदलायला हवं म्हणत सरकार हे स्वत:मध्येच गुंतलेले आहे असा टोलाही त्यांनी लगावला आहे.



आंबेडकर पुढे म्हणाले की, पूर्वी आम्ही एक प्रश्नासाठी एकाकडे म्हणजे मुख्यमंत्र्यांकडे जायचो आता आम्हाला एक प्रश्न दोन माणसांकडे घेऊन जावा लागतो. यावेळी उपमुख्यमंत्री हा शब्द वापरला नाही तर तुमचं कामही झालं नाही म्हणून समजा असा टोलाही त्यांनी शिंदे फडणवीस सरकारला लगावला आहे. ते दोन बिचारे आपल्यातून निघून गेले, नैसर्गिकरित्या गेले की अनैसर्गिकरित्या गेले यावर चर्चा सुरु आहे. कुठलंही प्रामाणिक सरकार असेल ज्याला कोणाला थोडीशी माणुसकी शिल्लक असेल त्यांनी डॉक्टरांचा अहवाव काय आहे पोलिसांचा अहवाल काय आहे हा लोकांसमोर मांडला असता. टीव्हीच्या माध्यमातून असं घडलं तसं घडलं, ते घडलं हे घडलं हा मला कळवतो तो मला कळतो अशारितेने तर्क बांधण्याचे काम थांबल असतं, असही आंबेडकर म्हणाले.

ज्याला आपण काबुमध्ये ठेवलं पाहिजे तो आता आपल्याला काबुमध्ये ठेवत असल्याची परिस्थिती आहे आणि ही सगळ्यात धोकादायक गोष्ट आहे. यामुळे लोकशाही धोक्यात आहे. लोकशाही धोक्यात आले तर आपल्याला जमिनीवरून हकलले जाईल, उद्या उरलेल्या ठिकाणाहून हकलेलं जाईल, कोण वाचवणार, असही आंबेडकर म्हणाले.

### आम्ही जर रस्त्यावर उचललो तर..

महाराष्ट्र सरकारला आवाहन आहे की, रस्ता आणि आमचं नात गेल्या चाळीस वर्षांपासून आहे, ते नवीन आहे. हा अधिकारी आम्हाला वापरायला लावू नका, आम्ही जर रस्त्यावर उचललो तर तुमची गाडी देखील रस्त्यावरून जाणार आहे, असा इशाराही त्यांनी शिंदे फडणवीस सरकारला दिला आहे.

### सध्या सत्ता ही चोरांची सत्ता झाली

**दिशा सालियन आणि सुशांतसिंह मृत्यू प्रकरणावरून हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप प्रत्योरोप पाहायला मिळासे. ज्यावरूनही प्रकाश आंबेडकर यांनी अप्रत्यक्षरित्या शिंदे फडणवीस सरकारवर हल्लाबोल केला आहे. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आम्ही चोरांच्या पंक्तीमध्ये बसलो आहे, सत्ता ही चोरांची सत्ता झाली आहे. त्यामुळे बदल करा आणि चांगले राज्य आणा, हा संदेश दिल्याबद्दल चंद्रकांत पाटीलांचे जाहीर अभिनंदन करतो, या सरकारचं काही खरं दिसत नाही, दुर्दैव मानतो की, काही व्यक्ती आपल्यातून निघून गेल्या, कशा निघून गेल्या यावरून वाद सुरु आहे, कोणाची नावं घेणार नाही, कारण माणूस शेवटी महत्त्वाचा आहे. पण त्या व्यक्तींच्या नावाने राजकारण सुरु झालं आहे.**

### माणुसकीहीन सरकार सत्तेवर

पण जिथे माणुसकीहीन सत्तेवर बसले आहेत, ज्यांना माणुसकी महत्त्वाची नाही. ज्यांना माणसाचा जीव महत्त्वाचा नाही, ज्यांना फक्त सत्ता आणि सत्ताच उपयोगी आहे, ज्यांच्याबद्दल अधिक विचार केलेलाच बरा. सत्ता येते जाते, सत्ता मतपेटीतून निर्माण होते आणि ते पाच वर्षांसाठीच होते ती अमरपट्टा नाही. पण त्याला अमरपट्टा करण्याचे कामकाज सुरु आहे. काँग्रेस पूर्वी म्हणायचे की आमच्याशिवाय कुणी राज्य करु शकत नाही. आता भाजप, आरएसएसवाले म्हणून लागले की, आमच्याशिवाय कोणी राज्य करू शकत नाही. त्यावेळी म्हणालो आणि आत्ताही म्हणतो, उद्या गाढव सत्तेवर जरी आला, तरी माजलेल्याला थोबपटणं दिलं तर गत्यंतर नाही, अशा शब्दात प्रकाश आंबेडकर यांनी शिंदे फडणवीस सरकारवर हल्लाबोल केला आहे.

# वाजपेयींच्या काळात भारताने प्रचंड प्रगती केली

## नितीश कुमारांकडून स्तुतीसुमने



। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

",बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी माजी पंबिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी अलीकडेच भाजपाशी युती तोडून राष्ट्रीय जनता दलासोबत सरकार स्थापन केलं आहे. भाजपाशी काडीमोड घेतल्यानंतर ते भारतीय जनता पार्टी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर राजकीय खेळी करण्याचा प्रयत्न करत आहेत. बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी नुकतंच माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्यावर स्तुतीसुमने उधळली. अटलबिहारी वाजपेयींच्या नेतृत्वात देशाने प्रचंड प्रगती केली, असं विधान नितीश कुमारांनी केलं.

वाजपेयींच्या जयंतीनिमित्त सरकारी कार्यक्रमाला संबोधित करताना नितीश कुमारांनी आठवणींना उजाळा दिला. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी माझा नेहमी आदर करायचे आणि आमच्यात मैत्रीपूर्ण संबंध होते, असंही ते म्हणाले.या कार्यक्रमात वाजपेयींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यानंतर नितीश कुमार म्हणाले, “अटल बिहारी वाजपेयींच्या नेतृत्वात देशाने खूप प्रगती केली. त्यांनी मला तीन खात्यांचा मंत्री म्हणून काम करण्याची संधी दिली. जेव्हा मी त्यांच्याकडे कोणताही प्रस्ताव घेऊन जायचो, तेव्हा ते त्याला होकार द्यायचे. त्यांनी माझं नेहमीच कौतुक आणि आदर केला. ते खूप प्रेमळ होते.”

खरं तर, २०१९ पासून बिहार सरकार वाजपेयींची जयंती सरकारी कार्यक्रम म्हणून साजरी करत आहे. अटल बिहारी वाजपेयी यांचं बिहारमधील राजकीय महत्त्व नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या चांगल्याप्रकारे लक्षात आलं आहे. वाजपेयींच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा यांची नितीश कुमारांनी पहिल्यांदाच तुलना केली, असं नाही. ऑगस्टमध्येही भाजपाशी युती तोडताना नितीश कुमारांनी “दोन भाजपा” असा उल्लेख केला होता.

जनता दल संयुक्तच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितलं की, नितीश कुमार यांनी नेहमीच वायजपेयींचं कौतुक केलं आहे. कारण ते त्यांच्याच पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात राजकीय उंचीवर गेले. नरेंद्र मोदींवर मात करण्यासाठी ते आता वाजपेयींचा राजकीय प्रतीक म्हणून अधिक वापर करत आहेत.

# राहुल गांधी यांची तुलना प्रभू श्रीरामाशी

## खुर्शिदांच्या रामवादात विश्व हिंदू परिषदेची उडी

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सलमान खुर्शीद यांनी राहुल गांधींची तुलना प्रभू श्रीरामाशी केल्यामुळे नवा वाद उफाळला असून त्यात आता विश्व हिंदू परिषदेने उडी घेतली आहे. ‘ज्यांनी श्रीरामाचे अस्तित्व नाकारले, त्यांची तुलना श्रीरामाशी कशी करू शकता? काँग्रेसच्या राजकारणाने गाठलेल्या खालच्या पातळीची ही परिसीमाच म्हणावी लागेल’, अशी संतप्त टीका विहिंपचे प्रवक्ता विनोद बन्सल यांनी केली आहे. कन्याकुमारीहून निघालेली ‘भारत जोडो’ यात्रा दिल्लीत आली असून सुमारे ३ हजार किमीच्या प्रवासामध्ये आपल्याला कुठेही द्वेष-हिंसा दिसली नाही. ही यात्रा समाजाला जोडण्यासाठी असल्याचे राहुल गांधी लालकिल्यावरील भाषणात म्हणाले होते. त्यावर, ‘स्वतःचे आजोबा फिरोज गांधी यांचा ज्यांना विसर पडला. आपल्या आईसोबत ज्यांना राहत येत नाही, ज्यांना स्वतःच्या कुटुंबाला जोडता येत नाही, ते आता देश जोडायला निघाले आहेत’, अशा शब्दांत बन्सल यांनी खिल्ली उडवली आहे.



राहुल गांधी यांनी दिल्लीतील कडाक्याच्या थंडीत केवळ टी शर्ट घालून महापुरुषांच्या समाधींचे दर्शन घेतले. त्याचा संदर्भ देत काँग्रेसचे नेते सलमान खुर्शीद यांनी, ‘राहुल गांधी हे योगी-तपस्वी असून भारत जोडो यात्रा ही त्यांची तपस्या आहे. राहुल गांधींना महापुरुषच म्हटले पाहिजे. श्रीराम सगळीकडे जाऊ शकले नाहीत, पण, त्यांच्या पादुका पोहोचत असत. भरत त्या ठिकठिकाणी घेऊन गेले. उत्तर प्रदेशमध्येही आम्ही पादुका पोहोचवल्या आहेत, आता श्रीरामही येतील’, असे म्हणत राहुल गांधींची तुलना श्रीरामाशी केली.

### अर्ध्याबाह्यांचा उपहास!

**दिल्लीत कडाक्याची थंडी असून सकाळच्या सात-आठ अंश सेल्सिअस तापमानात टी शर्ट घालून राहुल गांधी पदयात्रेत सहभागी झाले होते. त्याचा संदर्भ देत काँग्रेसच्या नेत्यांनी भाजपवर टीका केली होती. त्याला भाजपच्या समाजमाध्यम विभागाचे प्रमुख अमित मालविया यांनी उपहासात्मक प्रत्युत्तर दिले आहे. ‘आज सकाळी मला इंडिया गेटवर युरोपातून आलेले दोन पर्यटक भेटले. अर्ध्याबाह्यांचा टी शर्ट घालून ते सकाळी चालायला आले होते. मी त्यांना विचारले की, तुम्ही काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत आहात का? त्यावर ते हसून म्हणाले की त्यांना कडाक्याच्या थंडीची सवय आहे. थंडीत गतीने चालले की शरीरात उब निर्माण होते’, असे ट्वीट मालविया यांनी करून राहुल गांधींच्या टी शर्ट घालण्यावरून पुन्हा टीका केली आहे.**

# सलमानचे सुपरहिट चित्रपट

बॉलिवूडचा भाईजान अभिनेता सलमान खानचा आज 57 वा वाढदिवस आहे. 27 डिसेंबर 1965 रोजी इंदूर येथे सलमानचा जन्म झाला होता. वयाच्या 23 व्या वर्षी सलमानने बॉलिवूडमध्ये बीवी हो तो ऐसी या चित्रपटातून पदार्पण केलं. तेव्हापासून आजपर्यंत सलमानचे करोडो चाहते आहेत. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेकजण सलमानच्या स्टाईलचे चाहते आहेत.

1989 साली 'मैने प्यार किया' हा सलमानचा पहिला मुख्य भूमिका असलेला चित्रपट होता. या चित्रपटात त्याच्यासोबत अभिनेत्री भाग्यश्री होती. आजही या चित्रपटाचे लाखो चाहते आहेत.

हम आपके है कौन- सलमान खान की फिल्म 'हम आपके हैं कौन' के 25 साल हुए पूरे, जानें प्यार और रिश्तों का मतलब समझाने वाली फिल्म की **कुछ खास बातें**

1994 साली प्रदर्शित झालेल्या 'हम आपके है कौन' चित्रपटाने सलमानला अधिक लोकप्रियता मिळाली. या चित्रपटात अभिनेत्री माधुरी दीक्षित देखील मुख्य भूमिकेत होती.

**करण-अर्जुन**- 1995 साली प्रदर्शित झालेल्या 'करण-अर्जुन' या चित्रपटात अभिनेता शाहरुख खान देखील मुख्य भूमिकेत होता. या चित्रपटातील करण-अर्जुनची जोडी आजही प्रेक्षकांच्या स्मरनात आहे. **जुडवा** - करिश्मा कपूर की फिल्म 'जुड़वा' के रिलीज के 25 साल हुए पूरे, खास अंदाज में एक्ट्रेस ने जाहिर की खुशी - 1997 साली प्रदर्शित झालेल्या 'जुडवा' चित्रपटामध्ये सलमानने दोन भूमिका साकारल्या होत्या. या चित्रपटात त्याच्या सोबत अभिनेत्री करिश्मा कपूर आणि रंभा होती.

**हम साथ साथ है** - हम साथ साथ है फिल्म से जुड़ी दिलचस्प बातें- 1999 साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात मोठी स्टार कास्ट होती. या चित्रपटाचे आजही चाहते आहेत.

**हम दिल दे चुके सनम - 1999** साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटामध्ये सलमानसोबत अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन आणि अजय देवगण देखील मुख्य भूमिकेत होते.



# प्रयोगशील नाट्यनिर्मितीचा यशस्वी प्रयोग !

" गेली पंधरा वर्षे मी फक्त आणि फक्त शिवाजी मंदिरच्या फुटपाथवरच रमलो आहे, मोह होतो प्लाझाच्या फुटपाथवर जाण्याचा परंतु सध्या मी त्या मोहाला आवर घातलेला आहे. पण येणाऱ्या काळामध्ये नक्कीच ते शिवाजी मंदिर ते प्लाझाच्या फूटपाथमधील साठ फुटाचं अंतर पार करण्याचं धाडस करेन." - नाट्यनिर्माता राहुल भंडारे



सोळा वर्षांपूर्वी त्याची रंगभूमीवर एन्ट्री झाली. कोणत्याही नाटकाचा नायक किंवा लेखक-दिग्दर्शक म्हणून नव्हे, तर मराठी नाटकाचा निर्माता होण्याचे धाडस त्याने दाखवले होते. त्याच्या प्रयत्नांना मैत्रीचे पाठबळ मिळाले आणि राहुल भंडारे या तरुण धाडसी निर्मात्याची 'अद्वैत थिएटर्स' ही नाट्यसंस्था नाट्य निर्मितीच्या क्षेत्रात दिमाखात उभी राहिली. या वर्षाच्या अखेरीस रंगभूमीवर पदार्पण करत असलेले 'थँक्स डियर' हे राहुल भंडारे निर्मित पंचविसावे नाटक आहे.राहुल भंडारे यांना नाट्यनिर्मात्याने विविध विषयांना स्पर्श करणारी नाटकं रंगभूमीवर आणली. त्याने जागो मोहन प्यारे, करून गेलो गाव, प्यार किया तो डरना क्या, मी शारुक मांजरसुंभेकर, टॉम आणि जेरी, एकदा पहावं न करून अशा निव्वळ मनोरंजन करणाऱ्या नाटकांसोबत शिवाजी अंडरग्राऊंड भीमनगर मोहल्ला, ठष्ट, स्टॅच्यू ऑफ लिबर्टी अशा प्रबोधनात्मक नाटकांचेही प्रयोग यशस्वी करून दाखवले. राहुलच्या प्रयोगशील व धाडसी वृत्तीचा दुसरा पुरावा म्हणजे रत्नाकर मतकरी लिखित 'आरण्यक' हे पौराणिक नाटक त्याने 44 वर्षानंतर पुन्हा एकदा रंगभूमीवर आणले. महाभारतावर आधारित या अभिजात नाटकामध्ये दिलीप प्रभावळकर, रवी पटवर्धन, प्रतिमा मतकरी असे दिग्गज होते. राहुलने 'अलबत्या गलबत्या' आणि 'निम्मा शिम्मा राक्षस' निर्मित करून थांबलेल्या बालनाट्य चळवळीमध्ये प्राण फुंकले. 'अलबत्या गलबत्या' बालमित्रांनी तर अक्षरशः डोक्यावर घेतले. त्याचे सहाशेहून अधिक प्रयोग झाले. त्यामुळे राहुलला 'प्रयोगशील नाट्यनिर्माता' म्हणून ओळखला मिळाली. राहुल त्याच्या एकूण प्रवासाबद्दल सांगतो की," अर्थातच हा प्रवास सोपा नव्हता, संघर्षाचा होता. कॉलेजमध्ये एकांकिका किंवा हौशी नाटकं करत असताना किंवा चळवळीची पथनाट्य करताना कधी वाटलं नव्हतं की, मराठी रंगभूमीवर एक यशस्वी निर्माता म्हणून मी उभा राहीन.

# कतरिनाच्या ख्रिसमस सेलिब्रेशन फोटोवर चाहत्यांच्या भन्नाट कमेंट्स

बॉलीवूडमधील रोमँटिक जोडपं कतरिना कैफ आणि विकी कौशलने त्यांच्या संपूर्ण कुटुंबासह ख्रिसमस साजरा केला. इंडस्ट्रीतील त्याचे जवळचे मित्रही या पार्टीत सामील झाले होते. या पार्टीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे आणि सगळ्यांचं लक्ष वेधून घेत आहे ते एका कारणानं... हे फोटो पाहून कतरिना कैफ प्रेग्नंट आहे का? हा प्रश्न पुन्हा उठला आहे. कारण प्रत्येक फोटोमध्ये कतरिना ही फोटो काढताना कोणा नं कोणाच्या मागे लपताना दिसली. आणि म्हणूनच कतरिनाचे फोटो पाहून लोकांनी अंदाज लावला की अभिनेत्री प्रेग्नंट आहे. कतरिना आणि विकीने लग्नानंतरचा त्यांचा दुसरा ख्रिसमस फॅमिली आणि मैत्रपरिवारा सोबत आनंदाने साजरा केला. कतरिनाने एक फोटो शेअर केला आहे, ज्यात ती विकी कौशल,तिची बहीण ,फॅमिलीत अशा सगळ्यांच्या मागे उभी आहे. इतकेच नव्हेतर तर नेहा धुपीया आणि अंगद बेदी सोबतच्या फोटोतही ती मागे उभी होती. त्यामुळे आता एकच चर्चा आहे कतरिना कैफ बेबी बंप लपवत आहे की काय?

प्रत्येक फोटोमध्ये एक गोष्ट लोकांच्या लक्षात आली की प्रत्येक फोटोमध्ये कतरिना कोणाच्या ना कोणाच्या मागे उभी होती. एका यूजरने स्पष्टपणे लिहिले की, "कतरिना जाणूनबुजून अशा अँगलने उभी होती की तिचं बेबी बंप दिसू नयेट. ही तर प्रेग्नंट दिसत असल्याचे लोकांनी स्पष्टपणे लिहिले आहे. यासोबतच कतरिनाने ख्रिसमस ट्रीवर एक फोटोही टाकला होता ज्यात विकी तिला मागून मिठी मारत आहे. या फोटोमध्येही लोकांना कतरिनाचं बेबी बंप दिसलं. इतकेच नव्हे तर मध्यंतरी कतरिना कैफ एका अवॉर्ड शोमधे गेली होती . कतरिनानं या कार्यक्रमात चमकदार बॅकलेस गाऊन घातला होता, ज्यामध्ये ती इतकी जबरदस्त दिसत होती की चाहते तिची कौतुक करत होते. कतरिनाचा आकर्षक लूक पाहून चाहत्यांचे लक्ष तिच्या पोटाकडे गेले. त्या व्हिडिओमध्ये कतरिनाचे बेबी बंप दिसत होतं.कतरिना कैफ नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'फोन भूत' चित्रपटात दिसली होती.तर विकी कौशल OTT वर रिलीज झालेल्या 'गोविंदा नाम मेरा' मध्ये दिसला होता.



# 100 व्या कसोटीत डेव्हिड वॉर्नरचे द्विशतक!

## सेलिब्रेशन पडले महागात: सचिनच्या विक्रमाची बरोबरी



**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाचा स्टार सलामीवीर डेव्हिड वॉर्नरने क्रिकेट विश्वात इतिहास रचताना एक मोठा विक्रम केला आहे. त्याने आपला १००वा कसोटी सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळला, ज्यामध्ये त्याने द्विशतक झळकावले. मात्र यादरम्यान वॉर्नरने जोरदार आनंद साजरा केला आणि तो जखमी झाला. यानंतर त्याला दुखापतग्रस्त रिटायर व्हावे लागले. त्याने २५४ चेंडूत २०० धावा केल्या. यादरम्यान त्याने १६ चौकार आणि दोन षटकार मारले.

सध्या ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका या संघामध्ये कसोटी मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील बॉक्सिंग डे कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या डविड वॉर्नर याने एक दैदिप्यमान कामगिरी केली आहे. त्याने आपल्या १००व्या कसोटी सामन्यात शतक झळकावत मैलाचा दगड पार केला. अशी कामगिरी करणारा तो जगातील १०वा तर ऑस्ट्रेलियाचा दुसरा फलंदाज ठरला आहे. वॉर्नरच्या या शतकी खेळीमुळे ऑस्ट्रेलिया संघ या कसोटी सामन्यात मजबूत स्थितीत आला आहे आणि भारतासाठी ही आनंदाची बातमी आहे. जर या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा पराभव झाला, तर जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत जाण्याचा भारताचा मार्ग सुकर होईल.वॉर्नरने याआधी एकदिवसीय क्रिकेटमधील १०० व्या सामन्यातही शतक झळकावले होते. अशाप्रकारे डेव्हिड वॉर्नर आपल्या कारकिर्दीतील १००व्या एकदिवसीय आणि १००व्या कसोटी सामन्यात शतक झळकावणारा जगातील दुसरा आणि ऑस्ट्रेलियातील पहिला खेळाडू ठरला आहे. यापूर्वी ही कामगिरी वेस्ट इंडिजचा सलामीवीर गॉर्डन ग्रीनिजने ही कमाल केली होती. माजी कॅरेबियन खेळाडू आपल्या १००व्या वनडे आणि १००व्या कसोटी सामन्यात शतक झळकावणारा जगातील पहिला खेळाडू ठरला. त्याच्यानंतर आता वॉर्नरने ही कामगिरी केली आहे. याआधी २८ सप्टेंबर २०१७ रोजी वॉर्नरने आपल्या १००व्या वनडेत शतक झळकावले होते. हा सामना टीम इंडिया विरुद्ध बेंगळुरूमध्ये खेळला गेला, ज्यामध्ये वॉर्नरने १२४ धावांची खेळी केली.

आता वॉर्नरने कारकिर्दीतील १००व्या कसोटीत शतक झळकावून हा विक्रम केला आहे. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील मालिकेतील दुसरा कसोटी सामना मेलबर्नमध्ये खेळला जात आहे. या सामन्यात वॉर्नरने ऑस्ट्रेलियाच्या पहिल्या डावात द्विशतक झळकावले आहे. त्याने २५४ चेंडूत २०० धावांची खेळी खेळली. यादरम्यान वॉर्नरने दोन षटकार आणि १६ चौकार लगावले.

### सचिन तेंडूलकरच्या विक्रमाची बरोबरी


**कांगारू फलंदाज डेव्हिड वॉर्नरने बीच बॉक्सिंग डे कसोटीमध्ये एक खास कामगिरी केली आहे. त्याने आपल्या १००व्या कसोटीत शतक झळकावले आहे. अशी कामगिरी करणारा तो १०वा फलंदाज ठरला आहे. त्याच वेळी, इतर ऑस्ट्रेलियन खेळाडू आहेत ज्यांनी ही कामगिरी केली आहे. रिकी पॉन्टिंगने हे काम वॉर्नरच्या आधी केले होते. या शतकासह वॉर्नरने सचिनच्या खास विक्रमाची बरोबरी केली आहे. सलामीवीर म्हणून सर्वाधिक शतके ठोकणारा तो फलंदाज ठरला आहे. सचिनने डावाची सुरुवात करताना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ४५ शतके झळकावली आहेत आणि वॉर्नरनेही अशीच कामगिरी केली आहे.**

### सेलिब्रेशन करताना वॉर्नर जखमी झाला

**वॉर्नर १९६ धावांवर असताना त्याने चौकार मारून २०० धावा पूर्ण केल्या. यानंतर त्याने हवेत उडी मारून आनंद साजरा केला. मात्र यादरम्यान जमिनीवर येताना त्याच्या पायाला दुखापत झाली. त्याच्या डाव्या पायात ताण आला होता. तो वेदनेने ओरडू लागला. वॉर्नरला त्याचा सहकारी फलंदाज ट्रॅव्हिस हेडने साथ दिली. यानंतर वैद्यकीय पथक मैदानावर पोहोचले. त्या दुखापतीमुळे त्याला रिटायर व्हावे लागले. त्याचा व्हिडिओही सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.**

## शॉर्ट न्यूज »

### हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत खेळणाऱ्या महाराष्ट्राच्या पैलवानांवर कारवाई



**मुंबई । महाईन्यूज ।**

हिंदकेसरी कुस्तीसाठी महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या अस्थाई समितीचा महाराष्ट्रातील मल्लांना इशारा दिला आहे. हिंदकेसरी खेळणाऱ्या पैलवान यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. यासंदर्भात समितीने जाहीर पत्रदेखील जाहीर केलं आहे. महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष संजय कुमार सिंह यांनी पत्र जाहिर केलं आहे.

भारतीय शैली कुस्ती महासंघाने दिनांक ५ जानेवारी ते ८ जानेवारी दरम्यान हैदराबाद, तेलंगणा येथे अखिल भारतीय ५१ वी हिंदकेसरी कुस्ती स्पर्धा -२०२३ आयोजित केलेली आहे. या स्पर्धेमध्ये जर महाराष्ट्रातले पैलवान खेळले किंवा पंच तसेच पदाधिकारी तर महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेची अस्थाई समिती कारवाई करणार असे पत्रात नमूद केले आहे.

भारतीय शैली कुस्ती महासंघ व भारतीय कुस्ती संघ, हे दोन वेगवेगळे देशस्तरीय कुस्ती संघ आहेत. हिंदकेसरी हे टायटल वापरण्याचा अधिकार भारतीय शैली कुस्ती महासंघाला आहे.



# राजस्थानची पहिली महिला बॉडीबिल्डर प्रिया सिंग

**। बांगलादेश । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

राजस्थानच्या महिला बॉडीबिल्डरने देशासाठी गोल्ड मेडल आणलं आहे. तिचं सर्व स्तरातून कौतुक होत आहे. परंतु सरकाने तिला कसलीही मदत न केल्याचा ठपका ठेवण्यात येतोय. सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रिया सिंगवर शुभेच्छांचा पाऊस पडत आहे.

थायलंड येथील पटाया येथे १७ आणि १८ डिसेंबर २०२२ रोजी ३९ वी आंतरराष्ट्रीय बॉडीबिल्डिंग स्पर्धा होती. या स्पर्धेत राजस्थानची पहिली महिला बॉडीबिल्डर प्रिया सिंगने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत तिने सुवर्णपदक आणि प्रो. कार्ड जिंकलं आहे. प्रियाने देशाचं नाव उज्वल केल्याने सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होतोय.

प्रिया सिंग ही दलित समाजातील आहे. 'बाबासाहेबांच्या मुलीने देशाचं नाव उज्वल केलं, देख रहे हो मनू.., गुलामीच्या बेड्या तोडून तिने इतिहास रचला' अशा आशयाच्या पोस्ट सोशल मीडियामध्ये शेअर केल्या जात आहेत.प्रिया सिंगने आंतरराष्ट्रीय पातळीवरील पदक जिंकूनही नरेंद्र मोदी किंवा राजस्थानच्या अशोक गहलोत सरकारने तिचा सन्मान केला नाही. थायलंडहून परतल्यानंतर ती एअरपोर्टवरुन घरी एकटीच गेली. एका मुलाखतीमध्ये प्रिया सिंगने जातीवादामुळे भेदभाव होत असल्याचं नमूद केलं आहे.

भीम आर्मीचे प्रमुख चंद्रशेखर आझाद यांनी ट्विट करुन सरकारने प्रिया सिंगच्या प्रतिभेचा सन्मान केला नसल्याची खंत व्यक्त केली केली आहे. दलित असल्यामुळे प्रियावर अन्यात होत असल्याचा सूर सोशल मीडियामध्ये उमटत आहे. प्रियाने या सगळ्या पोस्ट तिच्या ट्विटर अकाऊंटवरुन शेअर केल्या आहेत.कसोटी मालिकेत त्याचे स्थान निश्चित दिसत नाही.

# राजकारण करणाऱ्या CA ला वॉर्नरचे 100 व्या कसोटीत चोख प्रत्युत्तर

**। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



डेव्हिड वॉर्नरच्या बॅटमधून गेल्या 1086 दिवसांपासून कसोटीत शतक आले नव्हते. वॉर्नर संपला असे वाटत होते. याचबरोबर क्रिकेट ऑस्ट्रेलियाने कर्णधारपदावरील त्याच्या बॅनबाबत दुटप्पी भूमिका घेत त्याचे खच्चीकरण केले. मात्र झुंजार वॉर्नरने या सर्वांना एका खास कसोटीत चोख प्रत्युत्तर दिले. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरी कसोटी बॉक्सिंग डेला सुरू झाली. ही खास डे नाईट कसोटी डेव्हिड वॉर्नरची 100 वी कसोटी होती. त्यात डेव्हिड वॉर्नरने शतकी खेळी करत मोठा धमाका केला.

डेव्हिड वॉर्नर आपल्या शंभराव्या कसोटीत शतकी खेळी करणारा 10 वा आंतरराष्ट्रीय खेळाडू ठरला. याचबरोबर डेव्हिड वॉर्नरने आपल्या 100 व्या वनडे सामन्यात देखील शतकी खेळी केली होती.